# अस्वल आणि मासा



अस्वलाने आपले घर सजविले.
त्याला काही मासे पकडायचे होते.
जे घरात सुंदर दिसतील.



IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 2 6/16/23 16:37





IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 4 6/16/23 16:37



त्याने मासे पकडायचा गळ
उचलला आणि तो
तळ्यावर मासे
पकडण्यासाठी गेला.

IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 5 6/16/23 16:37

त्याने गळाला गवत लावले आणि
तो गळ त्याने पाण्यात टाकला.



मासे कधी गळाला लागतात
याची तो वाट पाहू लागला.





मासे चलाख होते. त्यांनी गळाला चिखलात अडकवून टाकले.

IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 8 6/16/23 16:37



अस्वलाला वाटले की गळाला
मासे लागले, त्याने जोरात
गळ खेचला पण गळ काही
निघेना.

IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 9 6/16/23 16:37



अस्वलाला वाटले, बहुतेक
खूप मोठा मासा गळाला
लागला आहे. त्याने आणखी
जोर लावला पण त्याची
काठीच तुटून गेली.

IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 10 6/16/23 16:37

अस्वलाला खूप राग अला.





तो घरी गेला आणि जाळे
घेऊन परत आला.



IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 12 6/16/23 16:37





IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 13 6/16/23 16:37

त्याने जाळे पाण्यात सोडले.



IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 14 6/16/23 16:37

मासे चलाख होते, त्यांनी
जाळेच कापून टाकले.



अस्वलाला राग आला. त्याने विचार
केला की माशांना चांगली अद्दल
घडवायला हवी. आता मी स्वत:
जाऊन मासे पकडेन.



IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 16 6/16/23 16:37

त्याने तलावात उडी मारली.





तलावात अतिशय सुंदर मासे होते.
ते त्याच्या चोहीबाजूने पाहू लागले.
त्याच्यासोबत खेळू लागले.

IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 18 6/16/23 16:37



अस्वलाला हे खूप आवडले.
माशांनाही अस्वलासोबत खेळताना मजा आली.

अस्वलाने ठरविले की आता
मासे पकडायचे नाहीत. जेव्हा
मनात येईल तेव्हा त्यांच्यासोबत
खेळायचे.



IN-LLP-16-0094_Text_BearGoesFishing.indd 20 6/16/23 16:37